# गांधी गोंधळ

**लेखक**
हिंदुहृदयसम्राट स्वातंत्र्यवीर
**विनायक दामोदर सावरकर**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

---

प्रमुख वितरक
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**गांधी गोंधळ : विनायक दामोदर सावरकर**

**© हिमानी सावरकर**

**जनआवृत्ती संकल्पना : श्री. नानासाहेब गोडसे**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शीतल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**दुसरी आवृत्ती**
मे, २०१२ - २००० प्रती

**किंमत**
जनआवृत्ती रुपये १००/-

# गांधी गोंधळ

# अनुक्रमणिका


- स्वातंत्र्याचा मार्ग ... ७
- गांधीजी आणि हे दुधखुळे हिंदू लोक ! ... १८
- कोणता धर्म शांतिप्रधान आहे? ... २२
- ब्रिटिशांचा कैवारी ... २६
- व्हाअिसरायबरोबर जेवणारी असहकारिता ... ३०
- साबरमतीचा श्रमण ... ३५
- स्वातंत्र्याला विरोध ... ४८
- दे दान ! सुटे गिऱ्हाण ! ... ५६
- अत्याचार शब्दाचा अर्थ ... ६१
- स्वतंत्र भारताचा सम्राट कोण? ... ७०
- भगवती गोगलगाय ... ८०
- अहिंसात्मक भंडविधान ... ८३
- बोल आणि कृती ... ८६
- पण शुद्धी मरणार नाही ! ... ९१
- श्रद्धानंदांची हत्या आणि गांधींचा नि:पक्षपाती पक्षपात ! ... ९७


✦✦

# गांधी गोंधळ

## १. स्वातंत्र्याचा मार्ग

**'त्याचा येळकोट राहीना ।**
**मूळ स्वभाव जाअीना ।।'**

– तुकाराम

अेक वर्ष दीड वर्षापूर्वी जेव्हा महात्माजींनी प्रसिद्ध केलें की, आता आपण राजकारणात न पडता खादीच्या विधायक कार्यक्रमासच वाहून घेणार, तेव्हा त्यांच्या वेडगळ आणि गमाअू राजकारणास कंटाळलेल्या आणि त्या सावळागोंधळाच्या मागे लागल्याने राजकारणाचा गेल्या सहा वर्षांत जो बोजवारा उडाला आणि त्याने स्वदेशाची जी भयंकर दिशाभूल झाली ती पाहून अत्यंत दु:खित झालेल्या प्रत्येक देशभक्तास थोडें तरी हायसें वाटलें होतें. वाटलें होतें की, आता तरी यापुढे महात्माजी त्यांच्या ज्ञानाबाहेर, त्यांच्या बुद्धीबाहेर आणि त्यांच्या शक्तीबाहेर असलेल्या राजकारणाच्या क्षेत्रात नसती अुठाठेव करून आणि अहिंसा, असहकारिता, विधायक कार्यक्रम अित्यादी भाराभर पोकळ शब्दांस चघळीत बसून राष्ट्रातील तरुण पिढीचा तेजोभंग करण्याचा देशघातक व्यापार करण्याचें सोडून आपला चरखा बरा की आपण बरे, असें वर्तन ठेवितील. पण पहावें तों 'राजकारणात आपण पडणार नाही' हा निश्चय प्रसिद्ध करूनही पुन: आपले राष्ट्रीय सभेत अुपस्थित राहून शक्यतों आपल्या त्या पूर्वीच्या वेडगळ कार्यक्रमास अुचलून धरण्यापासून तों नागपूरच्या सत्याग्रहाचे प्रकरणी लिहिलेलीं भिकार पत्रें धाडण्यापर्यंत गांधीजींनी राजकारणात येता जाता ढवळाढवळ करण्याचें काम चालूच ठेविलें आहे.

कारण, त्यांनी मी राजकारणात पडणार नाही म्हणून जें म्हटलें तें देखील जेव्हां निरुपाय झाला तेव्हांच म्हटलेलें होतें. स्वराज्यपक्ष राष्ट्रीयसभेच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीतून (अहमदाबादच्या ऑ. इं. कॉ. क. च्या सभेतून) अुठून गेला असताही मोठ्या तोऱ्याने गांधीजींनी म्हटलें होतें, 'चिंता नाही, नुसती खोगीरभरती हवी कशाला! दोन अनुयायी अुरले तरी पुरे !' परंतु पुढे जेव्हा पुरते दोन अनुयायी देखील असे खंबीर मिळेनात की, ज्यांच्या जोरावर राष्ट्रीय सभेस खादीप्रचारिणी सभा बनवून आणि विधिमंडळात सरकारी विपक्षास आपलें राज्य वाटेल तसें हाकण्यास मार्ग निष्कंटक करून देअून आपणांस कृतकृत्य होता येअील तेव्हा मग पाय लटपटू लागले. त्या बैठकीतच महंमदअल्लींची आणि गांधीजींची ती रडारड, तीं हट्टी निराशेचीं असावें आणि शेवटची ती शरणागती हीं ज्यांच्या ध्यानात आहेत, त्यांच्या हें तेव्हाच लक्षात येअील की, गांधीजींचा राजकारणातून पाय जेव्हा अुखडला गेला तेव्हाच, मी आता राजकारणाच्या क्षेत्रात पाय टाकीतच नाही म्हणून ते म्हणू लागले. मी क्रांतिकारकांस नामशेष करण्यासाठी बंगाल्यात जात आहे म्हणून अगडबंब प्रतिज्ञा करून तें सत्कृत्य करण्यासाठी हा साधुपुरुष सरकारच्या आशीर्वादासह बाहेर पडला. पण तीन महिने जिवाची आटापिटी करूनही बंगाल्यातील राज्यक्रांतीच्या गुप्त चळवळींचा गळा घोटणें शक्य झालें नाही. तिकडे विधिमंडळात पूर्वीचे सर्व असहकारितावादी शिरले. हिंदुसंघटनाच्या प्रचंड चळवळीचा अुदय होअून त्या खिलाफतीच्या आफतीचें प्रेत अेकदाचें जाळून टाकिलें गेलें. अशा रीतीने क्रांतिकारकांत किंवा विधिमंडळात, हिंदूंत किंवा मुसलमानांत कोठेच कोणी विचारीत नाहीसें झाल्यावर मग जो संन्यास त्यांना घ्यावाच लागला होता, तो राजकारणाचा संन्यास आपण होअून घेण्याचा बहाणा करण्यात आला.

पण बळाबळाने ज्यास संन्यास देण्यात येतो त्या सर्व संन्याशांची जी दशा होते, तीच गांधीजींचीही होअून ते खादीकार्यात जरी गढलेले दिसत होते, तरी थोडा वाव मिळताच राजकारणात ढवळाढवळ करण्यासाठी त्यांचें मन सारखें चुळबूळ करीत आहे, ही गोष्ट मागे अनेक वेळा अुघडकीस आली होतीच. परंतु त्यांनी जेव्हा राजकारणात काही काळ पडत नाही म्हणून मागे म्हटलें तेव्हाच, राष्ट्रहिताचे दृष्टीने कर्तव्य असलें तरी तें करताना मनास दु:ख देणारें असें त्यांच्या देशविघातक



राजकारणावर टीका करण्याचें कार्य, आपणांस पुन: हाती घ्यावें लागणार नाही म्हणून आम्हांस आनंदच झाला असल्याने, आम्ही गांधीजींच्या असहकारी भाषेच्या आणि अहिंसात्मक सत्याग्रह अित्यादी शब्दांच्या अुच्चारासरशी मधून मधून येणाऱ्या या फेंफऱ्याच्या झटक्यांकडे दुर्लक्षच करीत गेलो. परंतु परवा त्यांनी नागपूरच्या सत्याग्रहाचे प्रकरणी जीं पत्रें आणि यंग अिंडियात जे लेख लिहिले आहेत, त्यांत त्यांनी जी अत्यंत तिरस्कारार्ह विधाने केलीं त्यांचा समाचार घेणें आता अगदी अपरिहार्यच झालेलें असल्याने या विषारी तत्त्वज्ञानाचा साप आपली फडा पुन्हा वर करण्याचे आधीच त्यास ठेचून टाकण्याचा प्रयत्न करणें प्राप्त होत आहे.

तत्त्वज्ञान कसलें, तें तत्त्वज्ञान आहे? तत्त्वाचें गाढ अज्ञान हेंच त्यातील अनन्य तत्त्व आहे. सत्याग्रहाची मीमांसा करताना हे साबरमतीचे श्रमण म्हणतात, 'जो सत्याग्रही असेल तो शस्त्र घेअीलच कशाला? तो सत्यासाठी स्वत: काही अेक प्रतिकार न करता स्वत:चें बलिदान देअील. अशा सत्याग्रहालाच अहिंसात्मक सत्याग्रह म्हणता येअील !' होय का? पण, आपण अहिंसेची नुकतीच अेक व्याख्या केली होती ती अितकी ताजी आहे की आपण पूर्वी काय बोललो होतो हें प्रसंग पडताच पूर्णपणे विसरून जाण्याची किंवा ती अेक पहाडी चुकी झाली म्हणून स्वत:सच मूर्ख ठरवून घेण्यास न कचरण्याची विसरभोळी कला ज्या आपणांस अुत्कृष्टपणे अवगत आहे, त्या आपणांस देखील ती नाकारता किंवा विसरता येणें शक्य नाही. पिसाळलेलीं कुत्रीं मारावीं किंवा नाही, कां त्यांनाही घरजावयासारखे पाहुणचार करीत पोशीत बसणाऱ्या आणि येत्या जात्या माणसास चावून मारू देणाऱ्या अहिंसेचें पुण्य संपादन करावें, या प्रश्नाचें अुत्तर देताना आपण सांगितलें होतेत की, अधिकतर अहिंसा टाळण्यासाठी जी अल्प हिंसा अपरिहार्यपणे करावी लागते तीव्र निषेध करून आपल्यास 'महात्मा' म्हणण्यासही बंदी केली. तथापि. आपण हिंसेची ती केलेली व्याख्या परत घेतली नाही किंवा त्या पिसाळलेल्या कुत्र्यास बंदुकीने मारण्याचा निषेध केला नाही.

पण आता तुम्ही जें पत्रात लिहिलेंत की, 'सत्याग्रही शस्त्र असें कधी धरणारच नाही. त्याला नुसतें सत्य आचरीत मरावयाचें तेवढें माहीत !' त्यावरून तर पिसाळलेल्या कुत्र्यांस मारण्यासाठी देखील सत्याग्रही बंदूक किंवा कोणतेंही शस्त्र

घेणार नाही असें सिद्ध होतें ! पिसाळलेलें कुत्रें चावल्यावर तो सत्याग्रहीही जेव्हा पिसाळेल तेव्हा तो जो काय दातांचा अुपयोग करील तेवढाच शस्त्राग्रह मात्र सत्याग्रहाच्या पवित्र कक्षेत येअू शकतो ! पिसाळलेल्या कुत्र्यांशी प्रसंग पडला असता त्यांचा प्रतिकार करणें म्हणजे शस्त्र न घेता त्यांच्यासमोर अुभे राहून त्यांस नुसतें म्हणत रहावयाचें की, 'अहो पिसाळलेल्या कुत्रोजी ! चावणें असत्य आहे; मला चावू नका. याअुपर चावत असालच तर हा मी सत्याग्रही वीर तुम्ही चावत असताना अेक पाअूलभर देखील मागे न होता किंवा हाती शस्त्र घेअून तुमचा प्रतिकार न करता तसाच्या तसाच चावून घेतो आणि तुम्हांस अितरांना असेंच चावत फिरण्यास मोकळें सोडतो !' याचें नाव शुद्ध सत्याग्रह !

जेव्हा अहिंसेची व्याख्या गांधीजींनी पिसाळलेल्या कुत्र्यांविषयी लिहिताना अशी केली की, अधिकतर हिंसा टाळावयास अपरिहार्य अशी अल्प हिंसा कर्तव्यच ठरते, तेव्हा आम्हांस वाटलें की, जन्मभर ठेचाळत का होअीना पण शेवटी या जन्मीच गांधीजींनाही अहिंसेचा अर्थ थोडा कळू लागला. गांधीजी त्यांच्या राजकारणी आयुष्यात जीं काही शुद्धीवर असल्यासारखीं अेकदोन वाक्यें बोलले आहेत, त्यांत यावरील वाक्यांची गणना आम्ही केली; परंतु गांधीजींची शुद्धी देखील त्यांच्या स्वाभाविक बेशुद्धीतीलच अेक क्षण असतो. नवख्या मुलाचा नेम चेंडूफळीत जसा कधी चुकून बरोबर लागतो, तसें राजकारणाच्या डावात गांधीजी अेखादे वेळी जें बरोबर बोलून किंवा करून जातात तें देखील चुकूनच केलेलें असतें. कारण, दुसऱ्याच क्षणी ते त्या बरोबर कृत्यालाच चूक म्हणण्याची आणखी अेक चूक हटकून करीत असतात. जर सत्याग्रही हा अितका पूर्ण अहिंसात्मक प्राणी असतो की, शस्त्र हातात धरणें हें देखील तो पाप समजतो, नीतिबाह्य समजतो, तर मग पिसाळलेल्या पन्नास कुत्र्यांस अेकत्र कोंडून त्यांस बंदुकीने ठार मारविण्याचें कृत्य करविणारा हा अेक हिंस्त्र हत्यारीच ठरत नाही काय? आणि जर्मन लढाअीचे वेळचा तो 'सैन्यांत भरती व्हा ! अिंग्रजांस बिनअट साह्य देअून रणांगणांत युद्धास जा' ! म्हणून ओरडत फिरणारा तो सैन्यभरतीसाठी नेमिलेल्या सरकारी अडत्यांचा धुरीण ! - तो कोण? अिंग्रजांस बिनअट साह्य देण्यासाठी जर्मनांस शस्त्राने बिनअट मारण्यास अुत्तेजन देत आजारी पडेतों हिंडणारा तो वेडापीर-तोही अहिंसेचाच भक्त होता नाही? आपल्या देशाशी



मित्रत्व जोडू अिच्छिणाऱ्या शेकडो जर्मनांना त्यांचें हिंदुस्थानशी वैर नसताना सपासप कापून काढणें ही हिंसा होत नाही ! पण जे आमचे पिढीजात शत्रू - त्यांच्याविरुद्ध केवळ आत्मसंरक्षणसाठी शस्त्र धरणें म्हणजे मात्र हिंसा होते ! नुसतें शस्त्र धरणें हीही गोष्ट सत्याग्रहास लाजिरवाणी असते ! मग जेव्हा स्वत:चे जिवावर बेतली तेव्हा कां सशस्त्र डॉक्टरास बोलावून पोटावर कर्तन करून घेतलेत? तुमच्या पोटात वसतीस येअून खाअून पिअून सुखी असलेल्या अेखाद्या ऑस्ट्रेलियाच्या वसाहतीप्रमाणे भरभराटात जाणारें तें रोगाणूंचें राष्ट्रचें राष्ट्र त्या डॉक्टराच्या शस्त्राने तुम्ही कत्तल करून टाकिलेंत नाही का? मग ती हिंसा कशी मानवली? त्या रोगाणूंच्या किंवा जर्मनांच्या पुढे, सत्याग्रही वीरांचें जें कर्तव्य आपण आता सांगत आहा, तसें नुसतें अुभें राहून त्यांच्या कृत्याचा निषेध करीत आपण मरणी मेला का नाहीत?

परंतु महात्माजींचें हृदय जितकें विशाल आणि अुन्नत आहे, तितकीच त्यांची बुद्धी आकुंचित आणि अपक्व आहे. अहिंसा, दया, क्षमा, अित्यांदी कर्णमधुर शब्दांस त्यांचें कोमल हृदय भुलून जातें. परंतु त्या शब्दांतील सत्य तत्त्वाचें यथातथ्य आकलन करण्याचें सामर्थ्य त्यांच्या बुद्धीत नसल्याने आणि तसें सामर्थ्य आपल्या बुद्धीत नाही हेंही समजण्याअितकी विवेचनशक्ती त्यांस अुरली नसल्याने ते केव्हां काही तर केव्हा काहीच बोलून जातात. वास्तविक पाहता अहिंसेची वर दिलेली व्याख्या हिंदु-धर्मग्रंथाचे पानापानावर खोदलेली आहे. पण ती पन्नाशी अुलटल्यावर गांधीजी शिकू लागले आणि लगेच शिकावयास लागल्यापासून अेक वर्ष संपण्यापूर्वीच विसरूनही गेले. पुन्हा लिहू लागले की, ''खरा सत्याग्रही शस्त्राला शिवण्याचा विचार देखील मनाला शिवू देत नाही. लाठी देखील हाती घेणें हें सत्याग्रहाचे विरुद्ध आहे. मात्र, आम्हांस पारतंत्र्यात डांबून ठेवणाऱ्या अिंग्रजांच्या साह्यार्थ, आमच्या स्वांतत्र्यप्राप्तीचे कार्यी साहाय्य देअू अिच्छिणाऱ्या जर्मनांना बंदुकी तरवारीनिशी ठार मारणें हें सत्याग्रहाच्या तत्त्वास आणि व्रतास साजेसेंच असतें ! आजपर्यंत अशा प्रकारची परस्परविरुद्ध भाष्यें आणि कार्यें गांधीजींच्या हातून अितकी घडलीं आहेत की, त्यांची अेक गाथाच गुंफता येअील. अर्थहीन शब्दांनी आणि बुद्धिहीन अर्थांनी त्यांचीं वाक्यें आणि कार्यें खचाखच भरलेंली असतात. स्वराज्य, खादी, शुद्ध स्वदेशी, असहयोग, सत्याग्रह, अहिंसा, असहकार अित्यादी शब्दांनी